10 FEB 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महादजी शिंदेंमुळे उत्तरेत मराठ्यांचा दबदबा

## प्रा. डॉ. अरुण भोसले; शिवाजी विद्यापीठात इतिहास विभागातर्फे कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ९ : अठराव्या शतकात उत्तर भारतात मराठ्यांचा दबदबा महादजी शिंदे यांनी निर्माण केला. १७७२-१७९४ या काळात त्यांनी मुघल सत्तेचा ढासळणारा डोलारा सांभाळला. मराठी सत्तेचा पाया घट्ट केला, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. अरुण भोसले यांनी येथे केले.

विद्यापीठातील इतिहास अधिविभाग आणि छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्रातर्फे डॉ. पी. एन. शिंदे लिखित 'अलिजाह बहादर : महादजी शिंदे' या ग्रंथावरील कार्यशाळेत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार प्रमुख उपस्थित होते.

इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविकात महादजी शिंदे यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यासाठी कार्यशाळा घेतल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. नरेंद्र राठोड म्हणाले, 'महादजी शिंदे हे ब्रिटिशांना शत्रू मानत. त्यांच्याशी दोन हात करण्यासाठी त्यांनी पाश्चात्यांप्रमाणे कवायती फौज निर्माण केली. उत्तरेच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका निभावली. या ग्रंथात प्राथमिक साधनांचा वापर करून चांगल्या प्रकारे एक संशोधनात्मक ग्रंथ डॉ. शिंदे यांनी लिहिला.'

### संशोधन होणे आवश्यक

लेखक डॉ. शिंदे म्हणाले, 'महादजी शिंदे हे शत्रूच्या रणनीतीचा अभ्यास करून आपली रणनीती ठरवत. मराठा साम्राज्याच्या इतिहासात महादजींचे कार्य देदीप्यमान आहे. त्यावर अधिक संशोधन होणे आवश्यक आहे.'

डॉ. चंद्रकांत अभंग म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याचे साम्राज्यात रुपांतर झाल्यानंतर उत्तरेकडे मराठ्यांचा विस्तार महादजी शिंदेच्या काळात वेगाने झाला. पानिपतच्या पराभवानंतर उत्तरेत मराठ्यांना गतवैभव प्राप्त करून देण्याचे काम त्यांनी केले.' डॉ. तानाजी हवालदार म्हणाले, 'अलिजाह बहादर : महादजी शिंदे' हा मराठा इतिहासातील एक मौल्यवान ग्रंथ आहे. मराठा इतिहासाच्या संशोधनात विद्यार्थ्यांना जिज्ञासा वाढविणारा हा ग्रंथ आहे.' इस्माईल पठाण उपस्थित होते. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी इतिहास विभागातील कार्यशाळेत बोलताना प्रा. डॉ. अरुण भोसले. शेजारी तानाजी हवालदार, पी. एन. शिंदे, नरेंद्र राठोड, चंद्रकांत अभंग, अवनीश पाटील, आदी.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2024
सकाळ

# विविध विकासात्मक प्रकल्पातून 'सामाजिक समावेशन' : हकीम

कोल्हापूर, ता. ९ : 'जागतिक बँक सामाजिक समावेशन आणि शाश्वत विकासासाठी कटिबद्ध आहे. ती विकसनशील देशांना त्यासाठी पतपुरवठा करीत आहे. समाजातील वंचित वर्गांच्या समावेशनासाठी या बँकेकडून जागतिक पातळीवर विविध विकासात्मक प्रकल्प सुरु आहेत', असे प्रतिपादन जागतिक बँकेमधील प्रमुख मानववंशशास्त्रज्ञ डॉ. रोक्सांनी हकीम यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे त्यांचे 'शाश्वत विकास आणि सामाजिक समावेशनाचे उपाय' या विषयावर विशेष व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन अधिष्ठाता प्रा. एस. एस. महाजन होते.

डॉ. रोक्सांनी हकीम यांनी विद्यार्थी व प्राध्यापक यांच्याशी मुक्तपणे संवाद साधत त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. जागतिक स्तरावर शास्वत विकासाची निर्धारित करण्यात आलेली ध्येये लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी स्वतःला सिद्ध केले पाहिजे असे त्यांनी सांगितले. जागतिक स्तरावर उपलब्ध असणाऱ्या संधीची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. यावेळी डॉ. नंदा पारेकर, नितीन माळी, विद्यानंद खंडागळे, ए. एम. गुरव, प्रल्हाद माने, अविनाश भाले आदी उपस्थित होते.




कोल्हापूर : जागतिक बँकेमधील प्रमुख मानववंशशास्त्रज्ञ डॉ. रोक्सांनी हकीम यांनी विचार मांडले. यावेळी डॉ. एस. एस. महाजन, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2024
लोकमत

# अभ्यासिकेचे मंगळवारी भूमिपूजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात नव्याने उभारण्यात येणाऱ्या ॲड.रूपाली पणदूरकर स्मृती अभ्यासिका इमारतीचे भूमिपूजन कुलगुरू डॉ.दिगंबर शिर्के यांच्या हस्ते व प्रकुलगुरू डॉ.प्रमोद पाटील यांच्या उपस्थितीत मंगळवारी (दि.१३) सायंकाळी ५ वाजता होत आहे. या अभ्यासिकेसाठी विद्यापीठाच्या भूगोलशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ.राम पणदूरकर व हेमकिरण पणदूरकर यांनी ३५ लाखांचा निधी मुलीच्या स्मृतिप्रीत्यर्थ उपलब्ध करून दिला आहे. गरीब मुलींचे शिक्षण व्हावे, यासाठीच पणदूरकर कुटुंबीयांची धडपड आहे. या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2024
सकाळ

# क्रीडा वसतिगृहाचे सोमवारी भूमिपूजन

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठात नव्याने क्रीडा वसतिगृह उभारण्यात येणार आहे. त्याच्या इमारतीचे भूमिपूजन सोमवारी (ता. १२) सकाळी अकरा वाजता पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के प्रमुख उपस्थित असणार आहेत. क्रीडा विभाग परिसरातील क्रिकेट पॅव्हेलियन शेजारी या वसतिगृहाची इमारत उभारण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठामध्ये आंतरराष्ट्रीय वेबीनारचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागामध्ये दि.१३ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत इलेक्ट्रॉनिक वेस्ट अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट या विषयावर तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय वेबीनारचे आयोजन केले आहे. या वेबीनारचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. या वेबीनार सोबतच इलेक्ट्रॉनिक वेस्ट अँड मॅनेजमेंट केंद्राचे उद्‌घाटन इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागामध्ये दि. १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय वेबिनार

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागामध्ये मंगळवार (ता. १३) ते गुरूवार (ता. १५) दरम्यान इलेक्ट्रॉनिक वेस्ट अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट या विषयावर आंतरराष्ट्रीय वेबिनार होणार आहे. या वेबिनार आणि इलेक्ट्रॉनिक वेस्ट अँड मॅनेजमेंट केंद्राचे उदघाटन इलेक्ट्रॉनिक्स विभागात सोमवारी (ता. १२) होईल. वेबिनारची प्रत्यक्षात सुरूवात मंगळवारी होईल. त्यामध्ये ग्रीस सरकारच्या शैक्षणिक सल्लागार डॉ. रानिया लम्पाउ, न्यूझीलंडमधील ॲरो संशोधन फौंडेशनचे डॉ. सोहम कफाफी, अशोक नलावडे मार्गदर्शन करणार आहेत. ई-कचऱ्याची समस्या जगाला भेडसावत आहे. त्या पार्श्वभूमीवर या वेबिनारचे आयोजन केले असल्याचे समन्वयक डॉ. एम. के. भानारकर यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2024
सकाळ

# एकांकिका स्पर्धेत 'नाट्यशास्त्र'चे यश

कोल्हापूर : बेळगाव येथील 'कॅपिटल वन' या संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांनी जयंत पवार लिखित 'लियर' या एकांकिकेचे सादरीकरण केले. उत्कृष्ट पार्श्वसंगीताचे पारितोषिक सिद्धांत खांडेकर याला मिळाले. तर स्त्री अभिनयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक नाट्यशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची विद्यार्थीनी ऋतुजा बडवे हिला मिळाले. दिग्दर्शन प्रशांत नागावकर यांनी केले. युवराज केळुसकर, विकास कांबळे व राज पाटील यांनी मार्गदर्शन केले. डॉ. निखिल भगत, डॉ. विनोद ठाकुरदेसाई, डॉ. जय तोडकर, डॉ. राजश्री खटावकर यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2024
सकाळ

# बोंगार्डे, रानमाळे यांना दोन लाखांचे बीजभांडवल

## महाराष्ट्र स्टुडन्ट इनोव्हेशन चॅलेंजमध्ये यश

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ९ : राज्य नावीन्यता सोसायटीतर्फे विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र स्टुडन्ट इनोव्हेशन चॅलेंज घेण्यात आले. त्यामधून शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थिनी दिशा बोंगार्डे, आदिती रानमाळे यांनी यश मिळविले. त्यांना नवसंकल्पनांसाठी दोन लाखांचे बीज भांडवल, प्रशस्तीपत्र मिळाले आहे.

प्रजासत्ताकदिनी पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते या विद्यार्थिनींना प्रमाणपत्र आणि प्रत्येकी रुपये एक लाख बीज भांडवल देऊन गौरविले. दिशा बोंगार्डे ही फूड टेक्नॉलॉजीच्या तृतीय वर्षात, तर आदिती रानमाळे ही कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या प्रथम वर्षात शिकत आहेत. नवसंकल्पना सादर करण्यासाठी त्यांना तंत्रज्ञान अधिविभागातील सहायक प्राध्यापक हर्षवर्धन पंडित यांचे मार्गदर्शन लाभले. दरम्यान, 'या स्पर्धेतील यश विद्यापीठासाठी आनंदाची बाब आहे. विद्यार्थ्यांनी समाजाच्या तळागाळातील विविध प्रश्नांवर तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रभावी समस्या समाधान शोधले पाहिजे', असे आवाहन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. एस. एन. सपली, प्रा. पंडित उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात १३ ते १५ दरम्यान आंतरराष्ट्रीय वेबीनार


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागामध्ये मंगळवार दि. १३ ते १५ रोजी दरम्यान 'इलेक्ट्रॉनिक वेस्ट अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट' विषयावर तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय वेबीनारचे आयोजन केले आहे. याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. वेबीनारमध्ये ग्रीस सरकारच्या शैक्षणिक सल्लागार डॉ. रानिया लम्पाउ, न्यूझीलंड ॲरो संशोधन फॉउंडेशनच्या डॉ. सीहम कफाफी व आदवीक हायटेकचे अशोक नलावडे, मार्गदर्शन करणार आहेत. इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागामध्ये सोमवार दि. १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता इलेक्ट्रॉनिक वेस्ट अँड मॅनेजमेंट केंद्राचे उद्घाटन होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2024
तरुण भारत

# दूरशिक्षण केंद्राच्या परीक्षा अर्जासाठी मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या बी. ए., बी. कॉम, एम. ए., (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम. कॉम, एम. एस्सी (गणित) आदी अभ्यासक्रमाच्या परीक्षा अर्ज भरणेसाठी सोमवार दि. १२ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. एम.ए./एम.कॉम. भाग १ व २, बी.ए.,बी.कॉम. भाग १, २ व ३ मधील जे विद्यार्थी सेमिस्टर १, ३ व ५ मध्ये उत्तीर्ण झाले आहेत त्यांनी सेमिस्टर २, ४ व ६ चा परीक्षा फॉर्म भरण्याची आवश्यकता नाही. तसेच जे विद्यार्थी सेमिस्टर १, ३, व ५ मध्ये अनुत्तीर्ण झाले आहेत. त्यांना अनुत्तीर्ण परीक्षा फॉर्म व संबंधित अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा फी भरावी लागणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापी रिपीटरचा फॉर्म भरलेले नाही त्यांनी https// sukapps.unishivaji.ac.in/studreg/#/login या लिंकवर भरावा, असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2024
पुढारी




कोल्हापूर : अ.भा. आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत यशस्वी कामगिरी करणारे शिवाजी विद्यापीठाचे खेळाडू. सोबत प्रशिक्षक, मार्गदर्शक.

# अ. भा. विद्यापीठ शूटिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाचे यश

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

कुरुक्षेत्र हरियाणा येथे झालेल्या ऑल इंडिया युनिव्हर्सिटी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने भरघोस यश मिळवले. पुरुष व महिला संघ गुवाहाटी (आसाम येथे होणाऱ्या अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

अ.भा. आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या ज्ञानेश्वरी पाटील (विवेकानंद कॉलेज) हिने १० मीटर एअर रायफल प्रकारात वैयक्तिक पदकाची कमाई केली. पिस्तल मिक्स शूटिंग संघाने ६०० पैकी ५७२ गुणांसह कांस्यपदक पटकावले. या संघात फिझा देसाई (छत्रपती शहाजी महाविद्यालय) व श्रेयस उपाध्ये (के . डब्लू, एस.कॉलेज सांगली) यांचा समावेश होता.

तसेच आदित्य साळुंखे (डी. आर. के. कॉलेज), सुमेध सासने, प्रतीक जोंग (लहू बाळा परित्रकर महाविद्यालय, पनोरे ) यांची १० मीटर रायफल शूटिंग संघात निवड झाली आहे. तसेच ज्ञानेश्वरी पाटील, ऐश्वर्या पोवार, गौरी कांबळे (१० मीटर एअर रायफल महिला संघ - सर्व विवेकानंद कॉलेज) अखिल भारतीय खेलो इंडिया स्पर्धेसाठी संघ पात्र ठरला आहे.

सर्व खेळाडूंना प्रशिक्षक डॉ. निलेश पाटील (राधानगरी महाविद्यालय), डॉ. धनंजय पाटील (आजरा महाविद्यालय), शिवाजी विद्यापीठचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदींचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2024
सकाळ

# विद्यापीठाचा नेमबाजी संघ 'खेलो इंडिया'साठी पात्र

कोल्हापूर, ता. ९ : अखिल भारतीय विद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत यश मिळविणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ अखिल भारतीय 'खेलो इंडिया'साठी पात्र ठरला. गुवाहाटी येथे २१ ते २७ फेब्रुवारीदरम्यान ही स्पर्धा होणार आहे.

कुरुक्षेत्र (हरियाणा) येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेत ज्ञानेश्वरी पाटील हिने १० मीटर एअर रायफल प्रकारात वैयक्तिक कास्यपदक मिळवले. तिने ६५४ पैकी ६३०.३ गुण मिळवले. ती विवेकानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. पिस्तूल मिक्स शूटिंग संघाने कांस्य पदकाची कमाई केली. संघाने ६०० पैकी ५७२ गुण मिळवले. शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या फिझा देसाईने ३०० पैकी २८४, तर के. डब्ल्यू. एस. कॉलेजच्या श्रेयस उपाध्येने ३०० पैकी २८८ गुण पटकावले. कॉमर्स कॉलेजचा आदित्य साळुंखे, तर लहू बाळा परित्रकर महाविद्यालयाने सुमेध सासने, प्रतीक जोंग १० मीटर रायफलसाठी पात्र ठरले आहेत. विवेकानंदच्या ज्ञानेश्वरीसह ऐश्वर्या पोवार, गौरी कांबळे याही स्पर्धेसाठी पात्र ठरल्या. त्यांना प्रशिक्षक डॉ. नीलेश पाटील (राधानगरी महाविद्यालय), डॉ. धनंजय पाटील (आजरा महाविद्यालय) यांचे मार्गदर्शन, तर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड यांचे प्रोत्साहन मिळाले.




कोल्हापूर : नेमबाजीत यश मिळविणारे श्रेयश उपाध्ये, ज्ञानेश्वरी पाटील, फिझा देसाई यांच्यासमवेत डॉ. नीलेश पाटील व डॉ. धनंजय पाटील.